Reviews of Literature
Volume 1 , Issue 4 / Nov 2013
ISSN:-2347-2723

# पंचायत समिती सदस्यांच्या नेतृत्वाचा तुलनात्मक अभ्यास
## विशेष संदर्भ :- हिमायतनगर तालुका

**पंजाब चव्हाण** , लक्ष्मण डोंगरे

डि.बी.कॉलेज भोकर जि. नांदेड.,

हुतात्मा, जयवंतराव पाटील, महाविद्यालय, हिमायतनगर.

सारांश :

भारतामध्ये त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था स्विकारण्यात आली. पंचायत समिती अंतर्गत सर्वात लहान घटक ग्रामपंचायत असते तर शीर्षस्थानी जिल्हा परिषद असते. ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद या दोन संस्थामध्ये समन्वय साधण्याचे काम पंचायत समिती करते. स्थानिक स्वराज्य संस्थेत मध्यवर्ती भुमिका निभावणाऱ्या पंचायत समितीला भारतात वेगवेगळया राज्यात वेगवेगळया नावाने ओळखले जाते. अंचलिक परिषद, क्षेत्र समिती, अंचलिक पंचायत अशा विविध नावाने ओळखली जाते. प्रत्येक पंचायत समिती अंतर्गत काही ग्रामपंचायती असतात. महाराष्ट्रामध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम 1961 च्या कलम 56 नुसार प्रत्येक तालुक्यासाठी एक पंचायत समिती निर्माण करण्यात आली आहे.

**प्रस्तावना :-**

जिल्हा परिषदेच्या एका मतदार संघात क्षेत्र पंचायत समितीचे दोन मतदारसंघ असतात. हिमायतनगर तालुक्यात 3 जिल्हा परिषद गट आहेत. तर पंचायत समितीचे 6 गण आहेत. महाराष्ट्रात एकुण 357 पंचायत समिती आहेत. पंचायत समितीचा एक सभापती, एक उपसभापती असतात. हिमायतनगर पंचायत समितीचे सभापती वानखेडे वामन विठ्ठलराव आहेत तर पंचायत समितीचे उपसभापती बिच्चेवार उज्वला गणेश या आहेत. पंचायत समिती व राज्य शासन यांच्यातील प्रशासकीय दूवा म्हणून गटविकास अधिकारी असतो. गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा प्रशासकीय प्रमुख व सचिव असतो. गटविकास अधिकारी पंचायत समितीच्या प्रशासनावर नियंत्रण ठेवतो. शासनाने योजनांसाठी मंजूर केलेला निधी योग्यरित्या खर्च करणे, शासकीय योजनांची अंमलबजावणी करणे ही कामे गटविकास अधिकारी यांची आहेत.

**हिमायतनगर तालुका पंचायत समिती निवडणूक एक विश्लेषण :-**

हिमायतनगर तालुका पंचायत समितीची निवडणुक फेब्रुवारी 2012 मध्ये संपन्न झाली. हिमायतनगर पंचायत समितीमध्ये एकुण 06 सदस्य आहेत. त्यामध्ये एक अनुसूचित जाती महिला, एक अनुसूचित जमाती महिला, एक इतर मागस वर्गीय महिला, एक इतर मागस वर्गीय पुरूष, एक इतर मागास वर्गीय पुरूष, एक खुला पुरूष अशा प्रकारचे राजकीय आरक्षण होते.

हिमायतनगर गण हे अनुसूचित जाती महिले करीता आरक्षित होते. या एका जागेसाठी एकुण 06 उमेदवार निवडणूक रिंगणात होते. त्यामध्ये कॉंग्रेस :- भवरे लक्ष्मीबाई मलु यांचा 2084 मतांनो विजय झाला.

सिरंजनी गण हा खुला पूरूषा करीता आरक्षित होता. या एका जागेसाठी एकुण 06 उमेदवार निवडणूक रिंगणात होते. कॉंग्रेसचे वानखेडे वामन विठ्ठलराव यांचा 2156 मतांनी विजय झाला.

पंचायत समिती सरसम गण हा इतर मागस वर्ग महिलांसाठी आरक्षित होता. या एका जागेसाठी एकुण 03 उमेदवार निवडणूक रिंगणात होते. त्यामध्ये कॉंग्रेसच्या बिच्चेवार उज्वला गणेश यांना 3597 मते मिळून त्यांचा विजय झाला.

सवना पंचायत गण अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित होता. सवना गणात एकुण 03 उमेदवा निवडणूक रिंगणात होते. त्यामध्ये शिवसेनेच्या हातमोडे आडेलाबाई दगडू यांना 3615 मते मिळून त्यांचा विजय झाला.

पंचायत समिती दुधड गण इतर मागास वर्ग पुरूषाकरीता आरक्षित होता. या गणात एकुण 07 उमेदवार निवडणूक रिंगणात होते. यापैकी अपक्ष उमेदवार राठोड बालाजी फुलसिंग यांना 2531 मते मिळाल्याने त्यांचा विजय झाला.

ISSN:-2347-2723

**पंचायत समिती सदस्यांचा राजकिय पार्श्वभूमी दर्शविणारा तक्ता क्रमांक 01**

| अ.क्र. | राजकिय पार्श्वभूमी आहे | राजकिय पार्श्वभूमी नाही | एकुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 01 | 01 | | | |
| 02 | 01 | | | |
| 03 | 01 | | | |
| 04 | 01 | | 04 | 66.66 |
| 05 | | 01 | | |
| 06 | | 01 | 02 | 33.33 |

पं.स.सदस्यांना राजकिय पार्श्वभूमी असणाऱ्या सदस्यांचा अभ्यास केल्यानंतर तक्ता क्रमांक 01 वरुन हे स्पष्ट होते की, पं.स.सदस्यांपैकी 04 सदस्यांना 66.66% राजकिय पार्श्वभूमी आहे तर 02 सदस्यांना राजकिय पार्श्वभूमी नसतांना निवडणूक निवडून आले.

**राजकिय पक्षांच्या सदस्यांची परिस्थिती दर्शविणारा तक्ता क्रमांक 02**

| अ.क्र. | कॉंग्रेस | राष्ट्रवादी | भा.ज.प. | शिवसेना अपक्ष | इतर | पक्ष | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 01 | - | - | - | - | - | 16.66 |
| 02 | - | - | - | 01 | - | - | 16.66 |
| 03 | - | - | - | - | 01 | - | 16.66 |
| 04 | 01 | - | - | - | - | - | |
| 05 | 01 | - | - | - | - | - | |
| 06 | 01 | - | - | - | - | - | 50.00 |

पं.स.हिमायतनगरमध्ये पक्षीय बलाबलाचा अभ्यास केला असता तक्ता क्रमांक 02 वरुन हे स्पष्ट होते की, 06 सदस्यांपैकी 04 सदस्य हे 66.66% कॉंग्रेस पक्षाचे आहेत तर एक शिवसेना, एक अपक्ष उमदेवार दिसून येतात. अर्थात हिमायतनगर तालुक्यात कॉंग्रेस या राष्ट्रीय पक्षाचा प्रभाव इतर पक्षांच्यामानाने सर्वाधिक दिसून येतो.

**निवडणुकित प्रचारतंत्राची माहिती दर्शविणारा तक्ता क्रमांक 03**

| अ.क्र. | जात | पैसा | धर्म | पक्ष | % |
|---|---|---|---|---|---|
| 01 | - | - | - | 01 | |
| 02 | - | - | - | 01 | |
| 03 | - | - | - | 01 | |
| 04 | - | - | - | 01 | |
| 05 | - | - | - | 01 | |
| 06 | - | - | - | 01 | 100% |

पं.स.च्या निवडणुकित निवडून येणाऱ्यांनी कोणत्या प्रचारयंत्रनेचा वापर केला याचा अभ्यास केल्यानंतर तक्ता क्रमांक 03 वरुन हे स्पष्ट होते की, एकुण 06 सदस्यांपैकी सर्वच सदस्यांचे असे म्हणणे आहे की, आमच्या निवडणूकीत पक्ष हाच प्रमुख प्रचारतंत्र हाता. पक्षाच्या प्रभावामुळे निवडून आल्याचे दिसून येते.

Reviews of Literature
Volume 1 , Issue 4 / Nov 2013
ISSN:-2347-2723

**राजकिय पक्षाचे महत्व मानणाऱ्या सदस्यांची माहिती दर्शविणारा तक्ता क्रमांक 04**

| अ.क्र. | राजकीय पक्षाचे महत्व मानणारे | राजकीय पक्षाचे महत्व न मानणारे | एकुण | % |
|---|---|---|---|---|
| 01 | 01 | -- | | |
| 02 | 01 | -- | | |
| 03 | 01 | -- | | |
| 04 | 01 | -- | | |
| 05 | 01 | -- | | |
| 06 | 01 | -- | 06 | 100% |

हिमायतनगर पं.स.सदस्यांना राजकिय पक्षाचे महत्व मानणाऱ्या सदस्यांचा अभ्यास केला असता तक्ता क्रमांक 04 वरुन हे स्पष्ट होते की, पं.स.मधील सर्व 06 सदस्य राजकिय पक्षाचे महत्व मानणारे आहेत. म्हणुन राजकिय पक्षाचे महत्व मानणारे 100% सदस्य दिसून येतात.

**पं.स.सदस्यांची सत्तेच्या वापराची माहिती दर्शविणारा तक्ता क्रमांक 05**

| अ.क्र. | स्वतःसाठी | जनकल्याणासाठी | एकुण | % |
|---|---|---|---|---|
| 01 | -- | 01 | | |
| 02 | -- | 01 | | |
| 03 | -- | 01 | | |
| 04 | -- | 01 | | |
| 05 | -- | 01 | | |
| 06 | -- | 01 | 06 | 100% |

पं.स.सदस्य हे आपल्या सत्तेचा वापर कोणासाठी करतात याचा अभ्यास केल्यानंतर हे तक्ता क्रमांक 05 वरुन स्पष्ट होते की, 06 च्या 06 ही सदस्य आपल्या सत्तेचा वापर स्वतःसाठी न करता समाजातील सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी करतात हे स्पष्ट होते.

**पं.स.सदस्यांच्या दृष्टिकोनातून राजकाराचा मुख्य आधार दर्शविणारा तक्ता क्रमांक 06**

| आधार | 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 | एकुण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात | | | | | | | 01 | 16.66 |
| पैसा | 01 | | | | | | 02 | 33.33 |
| पक्ष | | | | | 01 | 01 | 03 | 50.00 |
| कार्य | | 01 | 01 | 01 | | | | |

हमायतनगर पं.स.सदस्यांच्या दृष्टिकोनातून हल्लीच्या राजकारणाचा आधार कोणता आहे याच अभ्यास केल्यानंतर तक्ता क्रमांक 06 वरुन हे स्पष्ट होते की, एका सदस्याच्या दृष्टिकोनातून पैसा, दोन सदस्यांच्या दृष्टिकोनातून पक्ष, तीन सदस्यांच्या दृष्टिकोनातून आमचे सामाजिक राजकिय कार्य महत्वपुर्ण राजकिय आधार आहे. असे संशोधनातून दिसून येते.

Reviews of Literature
Volume 1 , Issue 4 / Nov 2013
ISSN:-2347-2723

**पं.स.सदस्यांच्या उमेदवारी प्राप्तीचा मार्ग दर्शविणारा तक्ता क्रमांक 07**

| आधार | 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 | एकुण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात | | | | | | | | |
| पैसा | | | | | | | | |
| पक्ष | 01 | 01 | | | | | 02 | 33.33 |
| कार्य | | | | | | 01 | 01 | 16.66 |
| नेता | | | 01 | 01 | 01 | | 03 | 50.0 |

हिमायतनगर तालुक्यातील पं.स.सदस्यांच्या उमेदवारी प्राप्तीचा मार्ग कोणता याचा अभ्यास केल्यानंतर तक्ता क्रमांक 07 वरुन हे स्पष्ट होते की दोन सदस्यांना पक्षामुळे उमेदवारी मिळाली एका सदस्यास सामाजिक आणि राजकिय कार्यामुळे व तीन उमेदवारांना आपल्या पक्षातील नेत्यामुळे उमेदवारी मिळाल्याचे अभ्यासातून दिसून येते.

**निवडणुकीत पैसा खर्च करणाऱ्या सदस्यांची माहिती दर्शविणारा तक्ता क्रमांक 08**

| अ.क्र. | निवडणुकीत पैसा खर्च केला आहे | निवडणुकीत पैसा खर्च केला नाही | एकुण | % |
|---|---|---|---|---|
| 01 | 01 | -- | | |
| 02 | 01 | -- | | |
| 03 | 01 | -- | | |
| 04 | 01 | -- | 04 | 66.66 |
| 05 | -- | 01 | | |
| 06 | -- | 01 | 02 | 33.33 |

हिमायतनगर पंचायत समिती सदस्यांनी निवडणुकीत निवडून येण्यासाठी पैसा खर्च केला आहे का ? याचा अभ्यास केल्यानंतर तक्ता क्रमांक 08 वरुन हे स्पष्ट होते की, चार सदस्यांनी निवडणुकीत पैसा खर्च केला आहे. तर दोन सदस्यांनी निवडणुकीत निवडून येण्यासाठी पैसा खर्च केला नसल्याचे स्पष्ट होते.

**पं.स.योजनेचा सर्वसामान्य नागरिकांचा लाभ दर्शविणारा तक्ता क्रमांक 09**

| अ.क्र. | पं.स.योजनेचा सा.ना.लाभ आहे | पं.स.योजनेचा सा.ना.लाभ नाही | एकुण | % |
|---|---|---|---|---|
| 01 | 01 | -- | | |
| 02 | 01 | -- | | |
| 03 | 01 | -- | | |
| 04 | 01 | -- | | |
| 05 | 01 | -- | | |
| 06 | 01 | -- | 06 | 100% |

हिमायतनगर पंचायत समिती मार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचतो का ? याचा अभ्यास केल्यानंतर तक्ता क्रमांक 09 वरुन हे स्पष्ट होते की, एकुण 06 सदस्यांच्या दृष्टिने पं.स.योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत 100% पोहचतो यावरुन हे स्पष्ट होते.

144

Reviews of Literature
Volume 1 , Issue 4 / Nov 2013

ISSN:-2347-2723

**पं.स.मधील प्रशासकीय अधिकारी लाच मागतात का ? याची माहिती दर्शविणारा तक्ता क्रमांक 10**

| अ.क्र. | लाच मागतात काय ? होय | लाच मागतात काय ? नाही | एकुण | % |
|---|---|---|---|---|
| 01 | 01 | -- | | |
| 02 | 01 | -- | | |
| 03 | 01 | -- | | |
| 04 | 01 | -- | 04 | 66.66 |
| 05 | -- | 01 | | |
| 06 | -- | 01 | 02 | 33.33 |

पं.स.मधील प्रशासकीय अधिकारी सर्वसामान्य नागरिकांची कामे, विकास कामांची देयके काढण्यासाठी, योजना मंजूर करु- घेण्यासाठी लाच मागतात का ? याचा अभ्यास केल्यानंतर तक्ता क्रमांक 10 वरुन हे स्पष्ट होते की चार सदस्यांच्या मते पं.स.अधिकार लाच मागतात तर दोन सदस्यांच्या मते लाच मागत नाहीत हे यावरुन स्पष्ट होते.

**निष्कर्ष :-**

हिमायतनगर तालुक्यातील सहा पंचायत समिती सदस्यांच्या नेतृत्वाचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात करण्यात आला आ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून नेतृत्वाची जडणघडणीचा, त्याचा कार्याचा, राजकिय पार्श्वभूमीचा, राजकिय आधाराचा, राजकि पक्षांच्या प्रभावाचा अशा विविध घटकांचा अभ्यास करण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्था मुख्य हेतू लोकशाहीचे विकेंद्रीकरण कर ग्रामीण विकासाची जबाबदारी स्थानिक प्रतिनिधीकडे सोपवून त्यांची निवड ग्रामीण जनतेच्या माध्यमातून व्हावी हा पंचायत राज व्यवस्थे मुख्य हेतू होता. हा हेतू साध्य करण्यासाठी भारत सरकारने आणि महाराष्ट्र शासनाने विविध समित्या आणि 73 व्या घटना दुरुस्त पंचायत राज व्यवस्था अधिक सक्षम, गतीमान, लोकाभिमुख करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेम राजकिय जागरुकता, राजकिय सहभाग, लोकशाहीच्या राजकारणाचे विकेंद्रीकरण, स्थानिक गरजा लक्षात घेऊन विकास होत अ स्थानिक स्वराज्य संस्था राष्ट्रीय नेतृत्व निर्माण करण्याच्या पाठशाळा ठरत आहेत. अनेक प्रतिनिधी आपल्या नेतृत्वाच्या परिपक्वते महाराष्ट्राच्या विधानसभेत आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटवतांना दिसून येत आहे. म्हणुन सक्षम लोकाभिमुख, जाणकार, कुशल अ मुत्सदी ग्रामीण नेतृत्व निर्माण होत आहेत.

**संदर्भग्रंथ सूची :-**


| अ.क्रं. | ग्रंथाचे नांव | लेखकाचे नांव | प्रकाशन |
|---|---|---|---|
| 01 | महाराष्ट्र शासन आणि राजकारण | डॉ.विठ्ठल मोरे | अरुणा प्रकाशन, लातूर |
| 02 | Rural Leadershi Emerging Trends | ए.एस.मलिक | दिप प्रकाशन, नवी दिल्ली |
| 03 | पंचायती राज्य व्यवस्था | डॉ.निशांत सिंह | राधा प्रकाशन, नवी दिल्ली |
| 04 | महाराष्ट्र शासन आणि राजकारण | डॉ.अशोक नाईकवाडे | कैला प्रकाशन, औरंगाबाद |
| 05 | पंचायत राज आणि महिला नेतृत्व | डॉ.पंजाब चव्हाण | लोकविद्या प्रकशन, परभण |
| 06 | पं.स. निवडणुक निकाल 2012 | तहसील कार्यालय, हि.नगर | |
| 07 | पं.स.सदस्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती | | |


डॉ. शेख शहेनाज अहमद
हिंदी विभाग
सहा. प्राध्यापक एवं शोधनिर्देशक
ह.ज.पा. महाविद्यालय हिमायतनगर